## निवडक

### न्यूझीलंड क्रिकेट संघासाठी नव्या मुख्य प्रशिक्षकांची निवड!



**नवी दिल्ली, दि. ६ :** न्यूझीलंड क्रिकेटने अधिकृतरित्या रॉब वाल्टर यांना सर्व फॉरमॅटमध्ये पुरुष क्रिकेट संघाच्या नव्या प्रशिक्षकपदी निवडले आहे. याआधी प्रशिक्षक गैरी यांनी ही जबाबदारी सांभाळली होती. आता ही जबाबदारी वाल्टर यांना देण्यात आली आहे. ते जुलै मध्ये जिम्बाब्वे दौऱ्यावर काम बघणार आहेत.

वाल्टर यांनी याआधी दक्षिण आफ्रिकेत पांढऱ्या चेंडू प्रशिक्षक स्वरूपात त्यांनी काम केले आहे. त्याचं हे कॉन्ट्रॅक्ट २०२८ पुरुष टी २० वर्पल्डकप पर्यंत असणार आहे. ज्याच यजमान पद ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांच्याकडून केलं जाणार आहे. त्यांनी दक्षिण आफ्रिका संघाला २०२४ मध्ये पहिल्यांदा टी२० वर्ल्डकपच्या फायनलमध्ये पोहोचवले होते. या स्पर्धेत आफ्रिका टीम सलग आठ विजय मिळवल्यानंतर फायनलमध्ये भारतीय संघाकडून त्यांना पराभव पत्करावा लागला होता. याशिवाय साऊथ आफ्रिका संघ यावर्षी चॅम्पियन ट्रॉफीच्या लीग स्टेजमध्ये सुद्धा स्थान बनवण्यात यशस्वी झाली होती.

---

### रायगड रॉयल्सचा दारुण पराभव



**नवी दिल्ली, दि. ५ :** वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग २०२५ मध्ये पुणे वॉरियर्सने आपल्या तगड्या कामगिरीने पुन्हा एकदा कौतुकाची थाप मिळवली आहे. रायगड रॉयल्सवर ८ विकेट्स आणि ३१ चेंडू राखून मोठा विजय मिळवत पुण्याने स्पर्धेत सलग दुसरे यश संपादन केले. संघाने गोलंदाजीत शिस्तबद्ध कामगिरी आणि फलंदाजीत संयम व आक्रमकपण दाखवत दोन्ही सामन्यात विजय मिळवला आहे. पहिल्या सामन्यात संघाने सोलापूर स्मॅशर्सचा पराभव केला होता.

प्रथम फलंदाजी करताना रायगड रॉयल्सचा डाव फारसा प्रभावी ठरला नाही. संघाची कर्णधार किरण नवगिरे शून्यवर बाद झाली. ज्यामुळे संघावर सुरुवातीपासूनच पुण्याच्या गोलंदाजांनी दडपण आणला. रायगडच्या फलंदाजांना खेळ उलगडता आला नाही. सहाव्या क्रमांकावर आलेल्या आयेशा शेखने सर्वाधिक २४ धावा केल्या, तर यशोदा घोगरेने १६ धावांचे योगदान दिले. मात्र बाकीच्या ५ फलंदाजांना दुहेरी आकडाही गाठता आला नाही. आशाप्रकारे रायगड रॉयल्सने २० षटकांत ८ बाद १०२ धावा केल्या. पुण्याकडून चिन्मयी बोरफळे हीने आपल्या अचूक आणि धारदार माऱ्याने ४ षटकांत १९ धावा देत ४ बळी घेतले. तिला समृद्धी डाळे हिने २ बळी घेत चांगली साथ दिली. या दोघींच्या माऱ्यापुढे रायगडचा डाव कोलमडला. लक्ष्याचा पाठलाग करताना पुणे वॉरियर्सच्या फलंदाजांनी जबाबदारीने आणि आत्मविश्वासाने खेळ करत १४.५ षटकांतच सामना संपवला. तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या अक्षया जाधवने नाबाद ३६ धावा (३७ चेंडू) करत संयमी खेळी केली, तर खुशी मुल्लाने २९ धावा केल्या. दोघींनी दुसऱ्या विकेटसाठी महत्त्वपूर्ण भागीदारी करत विजयावर शिक्कामोर्तब केले. या विजयामुळे स्पर्धेत पुणे वॉरियर्सने गुणतालिकेत उंच भरारी घेतली आहे. संघाचा संपूर्ण समतोल आणि सामूहिक कामगिरी ही त्यांची ताकद ठरत आहे. या सामन्यात चिन्मयी बोरफळेची गोलंदाजी अप्रतिम होती.

---

### १० वर्षीय भारतीय रेसर अतिका मीरला एकेसीईएलकडून व्यावसायिक पाठिंबा



**दुबई, दि. ६ :** भारतीय रेसिंग क्षेत्रातील एक उदयोन्मुख नाव १० वर्षीय अतिका मीर हिने सोमवारी आपल्या वाढत्या मोटरस्पोर्ट कारकिर्दीत एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला. युएईतील प्रतिष्ठित एकेसीईएल – जीपी टीमच्या व्यावसायिक मोटरस्पोर्ट विकास कार्यक्रमात निवड होणारी अतिका ही सर्वात तरुण भारतीय स्पर्धक ठरली आहे. या संधीमुळे तिच्या फॉर्म्युला १ पर्यंतच्या प्रवासाला एक नवी चालना मिळाली आहे.

एकेसीईएल – जीपी ही एक उच्च–कार्यक्षमता असलेली रेसिंग टीम असून एफआयए एफ –४, फॉर्म्युला रीजनल मिडल ईस्ट आणि एफ – ३ स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेते. आता त्यांनी एकेसीईएल – जीपी अकादमी' सुरू करत, यूएई आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील युवा रेसर्ससाठी संरचित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केला आहे. अतिका या पहिल्या बॅचमधील १५ निवडक ड्रायव्हर्सपैकी एक आहे.

अतिका मीर सध्या दुबईत वास्तव्यास असून ती फॉर्म्युला १ अकादमीच्या ड्राईव्ह युवर ड्रीम्स या कार्यक्रमाची पहिली भारतीय सहभागी ठरली आहे. जागतिक कार्टिंग सर्किटमध्ये तिच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे तिला ही संधी मिळाली आहे. यामध्ये रोटॅक्स युरो ट्रॉफी, रोटॅक्स इंटरनॅशनल ट्रॉफी, आयएएमई सिरीज (यूएई आणि युरोप), डब्ल्यूएसके युरो सिरीज, डब्ल्यूएसके सुपर मास्टर सिरीज आणि चॅम्पियन्स ऑफ द फ्युचर अकादमी यासारख्या प्रतिष्ठित स्पर्धांचा समावेश आहे.

अतिका म्हणाली, की , रेसिंग माझ्यासाठी केवळ खेळ नाही, ती माझी ओळख आहे. ट्रॅकवर मला स्वातंत्र्य वाटतं. एकेसीईएल – जीपी अकादमीत निवड होणं हे माझ्यासाठी स्वप्नासारखं आहे. मी भारत आणि दुबईतील माझ्यासारख्या मुलींना हे दाखवू इच्छिते की आपणही आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करू शकतो. एक दिवस मला फॉर्म्युला १ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करायचे आहे आणि त्यासाठी मी प्रामाणिकपणे मेहनत घेणार आहे.

एकेसीईएल – जीपी ग्रुपचे अध्यक्ष अमित कौशल यांनी तिच्या कौशल्याचे कौतुक करत सांगितले, अतिकाची शर्यतीतील समज, शिस्त आणि केंद्रित वृत्ती ही तिच्या वयाच्या पुढची आहे. पुढच्या १५ वर्षांत, आम्ही तिचा विकास कार्टिंगपासून सिंगल–सीटर शर्यतींपर्यंत घडवण्यासाठी कटिबद्ध आहोत. तिच्यात भविष्यातील फॉर्म्युला १ स्पर्धक होण्याची सर्व लक्षणं आहेत.

एकेसीईएल – जीपी अकादमीचे उद्दिष्ट आहे – युवा प्रतिभांना केवळ प्रगत प्रशिक्षण देणे नव्हे, तर त्यांना जागतिक मोटरस्पोर्ट व्यासपीठावर आणखी उंची गाठण्यासाठी सक्षम करणे. भारतातील मोटरस्पोर्ट क्षेत्रासाठी ही एक मोठी संधी मानली जात असून, अतिकाच्या रूपात देशाला भविष्यातील एफ – १ स्टार मिळू शकतो.

# भारताचे नेतृत्व करणे ही मोठी जबाबदारी : गिल

## संधी मिळणे माझ्यासाठी गौरवाची गोष्ट | २० जूनपासून लीड्स येथे कसोटी सुरू



**मुंबई, दि. ६ :**

रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यानंतर कसोटी संघाचे नेतृत्व मिळणे ही आनंदाची बाब असल्याचे गिलने सांगितले. ही संधी मिळणे माझ्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. मी कोणतीही ठराविक कर्णधारशैली घेऊन येत नाही. खेळाडूंशी संवाद साधणे, त्यांचे मन जाणून घेणे आणि त्यांना सुरक्षित वाटेल असे वातावरण तयार करणे हे माझे उद्दिष्ट आहे, असे भारतीय क्रिकेट संघाचा नवनिर्वाचीत कप्तान शुभमन गिल याने म्हटले आहे .

त्यानुसार, तो अनुभव वाढत जाईल तशी स्वतःची नेतृत्वशैली विकसित करेल. फलंदाज म्हणून त्याचे प्रमुख लक्ष संघासाठी जास्तीत जास्त धावा करण्यावर असेल, असेही त्याने स्पष्ट केले. मी सरासरी आणि आकड्यांकडे पाहत नाही, पण माझ्या फलंदाजीच्या कामगिरीवरून संघाला प्रेरणा देऊ इच्छितो, असे गिलने ठामपणे सांगितले.

२० जूनपासून लीड्स येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी रवाना होण्याआधी, भारताचा नव्या कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिल आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी गुरुवारी मुंबईत पत्रकार परिषद घेतली. बीसीसीआय मुख्यालयात आयोजित या पत्रकार परिषदेत गिलने कर्णधारपदाची जबाबदारी स्वीकारताना आपली भावना मांडली, तर गंभीरने बुमराहच्या भूमिकेपासून ते आरसीबी रोड शोवरील दुर्घटनेपर्यंत अनेक मुद्द्यांवर स्पष्टपणे मत मांडले.

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने स्पष्ट केले की वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पाचही कसोटी सामने खेळणार नाही. कोणत्या तीन सामन्यांमध्ये तो खेळेल, हे अद्याप ठरवण्यात आलेले नाही. निकाल आणि मालिकेची दिशा यावर त्या निर्णयाचे अवलंबन असेल, असे गंभीर म्हणाला .

बुमराहसारख्या खेळाडूची जागा घेणे कठीण आहे, पण आमच्याकडे पर्याय आहेत. आमचे वेगवान गोलंदाज कोणत्याही स्थितीत सामना जिंकू शकतात. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्येही मी म्हटले होते – गुणवत्ता पुरेशी आहे. असेही गंभीरने स्पष्ट केले. भारतीय संघाचे प्रशिक्षकपद स्वीकारताना नेहमीच दबाव असतो, हे कबूल करत गंभीर म्हणाला की, स्पर्धा कोणतीही असो, निकाल काहीही असो, मी सतत दबावाखाली असतो. त्याने प्रशिक्षकाच्या भूमिकेत असताना सातत्याने अपेक्षा आणि टीकेचा सामना करावा लागतो, याची जाणीवही दिली.

आठ वर्षांनंतर कसोटी संघात पुनरागमन करणाऱ्या करुण नायरच्या बद्दल बोलताना गंभीर याने स्पष्ट केले की, तो सध्या चांगल्या फॉर्ममध्ये आहे. इंडिया 'अ' संघासाठी त्याने द्विशतक झळकावले. काउंटी क्रिकेटचा अनुभवही त्याच्या कामी येईल. १–२ सामन्यांच्या आधारे आम्ही निर्णय घेणार नाही.

आयपीएल २०२५ चे विजेतेपद जिंकल्यानंतर आरसीबीच्या रोड शोदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरी दुर्घटनेबाबत विचारले असता, गंभीरने सांगितले की, मला कधीही वाटले नाही की रोड शो आवश्यक आहेत. २००७ साली टी–२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतरही मी याच मताचा होतो. लोकांचे जीवन सर्वांत महत्त्वाचे आहे. तो पुढे म्हणाला, उत्सव साजरा करायचा असल्यास तो बंद जागेत किंवा स्टेडियममध्ये मर्यादित ठेवावा. कालची घटना अत्यंत दुःखद होती. मी संबंधित कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे. भविष्यात अशी कोणतीही घटना टाळण्यासाठी आपण जबाबदारीने वागायला हवे.

शुभमन गिलच्या नेतृत्वात भारतीय कसोटी संघ इंग्लंडविरुद्ध नव्या पर्वाची सुरुवात करणार आहे. प्रशिक्षक म्हणून गंभीरच्या तडफदार शैलीसह, भारतीय संघ पुन्हा एकदा कसोटी क्रिकेटमध्ये वर्चस्व गाजवण्याच्या तयारीत आहे. मात्र बुमराहचा मर्यादित सहभाग, गिलचा फलंदाजी फॉर्म आणि संघ बांधणीसंदर्भातील निर्णय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रोहितच्या निवृत्तीवर वडील झाले भावूक

**मुंबई, दि. ६ :**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कसोटी कर्णधार आणि स्टार सलामीवीर रोहित शर्मा याने इंग्लंडविरुद्धच्या आगामी दौऱ्यापूर्वी निवृत्तीचा निर्णय घेतल्याने क्रिकेट विश्वात खळबळ उडाली. रोहितच्या या निर्णयामुळे केवळ त्याचे चाहतेच नव्हे, तर त्याचे वडीलही काहीसे व्यथित झाले होते.

मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या 'द डायरी ऑफ अ क्रिकेटर'स वाईफ' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात रोहित शर्माने आपल्या वडिलांच्या भावना उघड केल्या. माझे वडील ट्रान्सपोर्ट कंपनीत काम करत होते. त्यांनी आमच्या कुटुंबासाठी खूप त्याग केला आहे. त्यांनी माझ्या क्रिकेट कारकिर्दीचा प्रवास जवळून पाहिला आहे आणि विशेषतः त्यांना कसोटी क्रिकेट अत्यंत प्रिय आहे, असे रोहितने सांगितले.

रोहितने स्पष्ट केले की त्याच्या वडिलांना आधुनिक टी–२० अथवा मर्यादित षटकांचे क्रिकेट विशेष रुचत नाही. जेव्हा मी एकदिवसीय क्रिकेटमध्ये २६४ धावा केल्या, तेव्हा त्यांनी साधा 'शाब्बास' इतकाच प्रतिसाद दिला. त्यांच्यासाठी कसोटी क्रिकेटच खरी कसोटी आहे. त्यांना माझी छोटी–मोठी कसोटी खेळीही लक्षात राहते आणि त्यावर ते सविस्तर चर्चा करतात, असे रोहितने हसत सांगितले. आपल्या कसोटी निवृत्तीच्या निर्णयानंतर वडिलांची सुरुवातीची प्रतिक्रिया काहीशी निराशाजनक होती, असे मान्य करत रोहित म्हणाला, सुरुवातीला त्यांना याचा धक्का बसला. पण नंतर त्यांनी शांतपणे निर्णय स्वीकारला आणि आनंदही व्यक्त केला.

रोहितने आपल्या कारकिर्दीत १२ शतके आणि १८ अर्धशतके झळकावत कसोटी क्रिकेटमध्ये आपली छाप सोडली. त्याने भारताला २०२३ च्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचवले होते. रणजी, दुलीप, इराणी ट्रॉफीपासून 'इंडिया अ' पर्यंतचा टप्पा पार करत त्याने भारतीय कसोटी संघात स्थान मिळवले. मी लाल चेंडूच्या क्रिकेटमध्ये मोठा प्रवास केला आहे. वडिलांनी तो प्रवास जवळून पाहिला आहे. त्यामुळे त्यांचे त्या फॉर्मॅटबद्दलचे प्रेम विशेष आहे. आज मी ज्या ठिकाणी आहे, त्यामागे त्यांच्या योगदानाचा मोठा वाटा आहे, अशी भावनिक कबुलीही रोहितने दिली. रोहितच्या निवृत्तीने भारतीय कसोटी फलंदाजीतील एक युग संपुष्टात आले असून त्याची उणीव भरून निघणे कठीण असल्याचे मत क्रिकेट जाणकारांनी व्यक्त केले आहे.

# पियूष चावलाची सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती

## विश्वचषक विजेता लेग-स्पिनरचा प्रवास



**मुंबई, दि. ६ :**

भारताच्या २००७ टी–२० आणि २०११ एकदिवसीय विश्वचषक विजेत्या संघाचा सदस्य, अनुभवी लेग–स्पिनर पियूष चावला याने गुरुवारी सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली. ३५ वर्षीय चावला याने २० वर्षांहून अधिक काळ क्रिकेट खेळून मैदानाचा निरोप घेतल्याचे इंस्टाग्राम पोस्टद्वारे जाहीर केले.

दोन दशकांहून अधिक काळ मैदानावर घालविल्यानंतर या सुंदर खेळाला निरोप देण्याची वेळ आली आहे. जरी मी क्रिकेटपासून दूर जात आहे, तरीही क्रिकेट नेहमी माझ्या आत जिवंत राहील, अशा भावना त्याने आपल्या निवृत्ती घोषणेत व्यक्त केल्या. चावला याने भारतासाठी तीन कसोटी, २५ एकदिवसीय आणि सात टी–२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले असून त्यात एकूण ४३ विकेट्स घेतल्या. विश्वचषक स्पर्धांमधील सहभाग ही त्याच्या कारकिर्दीतील मोठी कामगिरी मानली जाते. तो २००७ च्या टी–२० विश्वचषक आणि २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होता.

भारताचे सर्वोच्च स्तरावर प्रतिनिधित्व करणे, तसेच दोन विश्वचषक विजेत्या संघात स्थान मिळविणे, ही माझ्यासाठी गौरवाची बाब होती. या प्रवासातील प्रत्येक क्षण माझ्यासाठी आशीर्वाद होता, अशी भावनिक प्रतिक्रिया चावलाने आपल्या निवेदनात व्यक्त केली.

चावलाची ओळख इंडियन प्रीमियर लीगमधील यशस्वी गोलंदाज म्हणूनही आहे. १९२ सामन्यांत १९२ बळींसह तो आयपीएलच्या इतिहासात संयुक्तपणे तिसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक यशस्वी गोलंदाज ठरला आहे. २०१४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळताना त्याने अंतिम सामन्यात विजयी धाव फटकावून संघाला चॅम्पियन बनवले होते.

मुंबई इंडियन्सकडून २०२४ आयपीएलमध्ये खेळलेला चावला याआधी पंजाब किंग्ज, कोलकाता नाईट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या फ्रँचायझींसाठीही खेळला होता. आयपीएलमधील प्रत्येक क्षण माझ्यासाठी खास होता. या लीगने माझ्या कारकिर्दीला नवे वळण दिले, असा उल्लेख त्याने केला.

आपल्या निवृत्ती पत्रात चावलाने प्रशिक्षक के. के. गौतम आणि दिवंगत पंकज सारस्वत यांचे विशेष आभार मानले. या दोघांनी मला केवळ क्रिकेटपटू म्हणून नाही तर एक व्यक्ती म्हणूनही घडवले, असे तो म्हणाला. त्याचबरोबर विविध संघ, संघटनांबरोबरच त्याच्या कुटुंबाचे आणि चाहत्यांचेही त्याने आभार मानले. माझ्या दिवंगत वडिलांचा विशेष उल्लेख करतो. त्यांचा माझ्यावर असलेला विश्वास आणि पाठिंबा हाच माझ्या यशामागील खरा आधार होता. त्यांच्या उपस्थितीशिवाय हा प्रवास पूर्ण होणे शक्यच नव्हते, असेही त्याने नमूद केले.१५ व्या वर्षी स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या चावलाने उत्तर प्रदेश आणि भारताच्या १९ वर्षांखालील संघांचे प्रतिनिधित्व केले होते. २००५–०६ च्या चॅलेंजर मालिकेत त्याने सचिन तेंडुलकरला गुगलीवर बाद करत आपल्या नावाची चर्चा निर्माण केली होती. १७ व्या वर्षी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या चावलाने घरगुती क्रिकेटमध्ये सर्व फॉरमॅटमध्ये मिळून १००० पेक्षा अधिक बळी घेतले आहेत. मी आता एका नव्या प्रवासासाठी सज्ज आहे. क्रिकेटमधून घेतलेल्या शिकवणी आणि अनुभव माझ्या पुढच्या वाटचालीसाठी मार्गदर्शक ठरतील, असे सांगत चावलाने आपल्या भावी योजना स्पष्ट केल्या नाहीत.

# फ्रेंच ओपन फायनल : कोको गॉफ विरुद्ध आर्यना सबालेन्का

## दोन खेळाडूंची थरारक भिडंत | तब्बल १२ वर्षांनी टॉप–२ खेळाडूंमध्ये ग्रँड स्लॅम अंतिम फेरी





**पॅरिस, दि. ६ :**

रोलँड गॅरोसवरील प्रतिष्ठित फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत यंदा दोन जागतिक अव्वल खेळाडू आमनेसामने भिडणार असून, दुसऱ्या मानांकित कोको गॉफ आणि अव्वल मानांकित आर्यना सबालेन्का यांच्यात जेतेपदासाठी जोरदार टक्कर रंगणार आहे. २०१८ ऑस्ट्रेलियन ओपननंतर प्रथमच डब्ल्यूटीए क्रमवारीतील टॉप–२ खेळाडूंमध्ये ग्रँड स्लॅम अंतिम फेरी रंगणार असून, फ्रेंच ओपनमध्ये हे २०१३ नंतर प्रथमच घडणार आहे.

बेलारूसच्या सबालेन्काने उपांत्य फेरीत गतविजेती इगा स्विएटेकचा ७–६(१), ४–६, ६–० असा पराभव करत पॅरिसमधील तिच्या वर्चस्वाचा शेवट केला. क्ले कोर्टवरील स्विएटेकची २६ सलग विजयांची मालिकाही याच पराभवाने खंडित झाली. कोर्ट फिलिप–चॅटियरवर दोन तास १९ मिनिटे रंगलेल्या या सामन्यात सबालेन्काने जबरदस्त ताकद, अचूकता आणि मानसिक स्थैर्य दाखवत चार वेळा फ्रेंच ओपन विजेत्या स्विएटेकला नमवले.

इगाला इथे हरवणे ही माझ्या कारकिर्दीतील मोठी गोष्ट आहे, असं विजयानंतर सबालेन्का म्हणाली. तिचा २०२५ हंगामातील हा ४० वा मुख्य ड्रॉ विजय ठरला आहे, जो दौऱ्यात सर्वाधिक आहे. यामुळे तिने २०२० नंतरच्या दशकात सर्वाधिक (६) ग्रँड स्लॅम फायनल गाठण्याचा पराक्रम केला आहे.

दुसऱ्या उपांत्य फेरीत, अमेरिकेच्या कोको गॉफने फ्रान्सच्या वाइल्डकार्ड खेळाडू लोइस बोइसनवर ६–१, ६–२ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवत अंतिम फेरीत प्रवेश केला. बोइसनने उपांत्य फेरीपर्यंत केलेली घोडदौड टेनिस जगतात चर्चेचा विषय ठरली होती. मात्र गॉफने तिच्या अनुभवाचा पुरेपूर वापर करून या सामन्यावर सहज नियंत्रण मिळवले.

गॉफसाठी ही दुसरी फ्रेंच ओपन अंतिम फेरी आहे. २०२२ मध्ये ती स्विएटेकविरुद्ध अंतिम फेरीत पराभूत झाली होती. परंतु आता ती अधिक परिपक्व झाली असून, २०२३ यूएस ओपनच्या विजयानंतर तिचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला आहे. विशेष म्हणजे त्या अंतिम सामन्यात तिने सबालेन्काचाच पराभव केला होता. गॉफ आणि सबालेन्का यांच्यातील ही ११वी आंतरराष्ट्रीय लढत ठरणार आहे. दोघींनी शेवटच्या चार लढतींत प्रत्येकी दोन विजयांची नोंद केली आहे. त्यामुळे ही अंतिम फेरी अतिशय चुरशीची ठरणार, यात शंका नाही. २०२३ यूएस ओपन फायनलमध्ये गॉफने सबालेन्कावर विजय मिळवला होता, तर सबालेन्काने यावर्षीच्या ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले होते. फ्रेंच ओपनच्या इतिहासात याआधी २०१३ मध्ये सेरेना विल्यम्स आणि मारिया शारापोव्हा यांच्यात अव्वल दोन मानांकित खेळाडूंचा अंतिम सामना झाला होता. त्यानंतर प्रथमच गॉफ व सबालेन्का ही जोडी अशी थेट भिडणार आहे. २०१८ ऑस्ट्रेलियन ओपननंतर ही डब्ल्यूटीए क्रमवारीतील अव्वल दोन खेळाडूंची ग्रँड स्लॅम अंतिम लढत आहे.

शनिवारी रंगणाऱ्या या अंतिम फेरीकडे संपूर्ण टेनिस विश्वाचे लक्ष लागले आहे. गॉफची अष्टपैलू शैली आणि सबालेन्काची आक्रमक ऊर्जा यांच्यातील हा सामना आधुनिक महिला टेनिसचा सर्वोच्च दर्जा सादर करणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे. ग्रँड स्लॅम इतिहासाच्या पानांमध्ये एक नवीन अध्याय लिहिला जाण्याची ही वेळ आहे . गॉफ की सबालेन्का, याचे उत्तर शनिवारी मिळेल.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २७५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 275 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .